महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक- ४२१,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
दूरध्वनी क्र ०२२-२२७९३१७१ Email ID: vishi५.hted-mh@mah.gov.in

क्र. संकीर्ण २०२२/प्र.क्र. १२९/विशि- ५ दिनांक - १३/०१/२०२३

**प्रति,**

१. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई
२. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे
३. राज्य संपर्क अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.)

**विषय**- महाराष्ट्र शासन व युनिसेफ यांच्या संयूक्त विद्यमाने महाविद्यालयीन युवकांच्या (students youth) सहभागाने नैसर्गिक संसाधनांचे सरंक्षण/ संवर्धन व पाण्याची बचत संयुक्त अभियान राबविणे बाबत.

महोदय,

महाराष्ट्र शासन व युनिसेफच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन युवकांच्या (students youth) सहभागाने नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण तसेच पाण्याची बचत या अभियानाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या अभियानांतर्गत राज्यातील १३ निवडक जिल्ह्यातील वरीष्ठ महाविद्यालयात (उच्च व तंत्र शिक्षण) शिक्षण घेत असलेल्या युवक/युवतींची पर्यावरण, हवामान बदल आणि पाणी बचत याविषयी माहिती वृद्धिंगत करणे, कौशल्य विकसित करण्यासाठी प्रशिक्षणे घेणे, शैक्षणिक संस्थास्तरावर ग्रीन क्लब ची स्थापना करणे, पाणी बचतीच्या उपाययोजना राबविणे, इत्यादी उपक्रम राबविले जाणार आहेत. या उपक्रमासंबंधी आपल्या स्तरावरून सोबत जोडलेल्या प्रपत्रानुसार कार्यवाही करावी.

(विकास चंद्र रस्तोगी)
प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण
महाराष्ट्र शासन

**प्रत माहिती व उचित कार्यवाहीस्तव**

१. संचालक, उच्च शिक्षण संचालनालाय, उच्च शिक्षण, पुणे
२. तंत्र संचालनालय शिक्षण, मुंबई
३. डॉ. विठ्ठल बांदल, प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, पुणे तथा नोडल अधिकारी (तंत्रशिक्षण)

४. श्रीमती प्रतिभा दिक्षीत, प्रशासन अधिकारी, उच्च शिक्षण संचालनालय तथा नोडल अधिकारी (उ.शि.)

५. श्री. युसुफ कबीर,युनिफेस, राज्य संपर्क अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.) तथा नोडल अधिकारी (NSS)

६. मुख्य क्षेत्रीय अधिकारी (CFO), युनिसेफ महाराष्ट्र, मुंबई

७. उमा असलेकर, कार्यकारी संचालक, ॲडवान्सड सेंटर फॉर वॉटर रिसोर्सेस डेव्हलपमेंट ॲंड मॅनेजमेंट (ॲक्वाडॅम), पुणे.

प्रपत्र १: उच्च आणि तंत्र शिक्षण संचालनालय, आणि राष्ट्रीय सेवा योजना भूमिका आणि जबाबदाऱ्या

## १. राज्याचे नोडल अधिकारी

क. उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग आणि युनिसेफद्वारे राबविण्यात येणाऱ्या युवकांच्या सहभागाने नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण/ सवंर्धन तसेच पाण्याची बचअभियानाच्या राज्यस्तरीय अंमलबजावणीची जबाबदारी राज्य नोडल अधिकारी यांची असेल.

ख. राज्य नोडल अधिकारी हे उच्च शिक्षण, तंत्र शिक्षण आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्यामध्ये समन्वय ठेवून अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करतील.

ग. राज्य नोडल अधिकारी हे या अभियानाचे मुख्य संपर्क अधिकारी असतील व वेळोवेळी युनिसेफच्या सहाय्याने अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करतील.

घ. अभियानाच्या प्रत्येक टप्प्यावर कार्यक्रमाचा आढावा घेऊन कार्यक्रमाची प्रगती अहवाल राज्य कार्यक्रम सचिवालयास (प्रोग्राम सेक्रेटरीएट) यांना सादर करतील.

ङ. अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी रा.से.यो, राज्य संपर्क अधिकारी हे राज्य कार्यक्रम सचिवालयासोबत धोरण निश्चित करून त्याची अंमलबजावणी करतील.

## २. उच्च शिक्षण संचालनालय व तंत्र शिक्षण संचालनालय

युवकांच्या सहभागाने नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण / संवर्धन तसेच पाण्याची बचत अभियानाच्या अंमलबजावणी मध्ये आपल्या विभागाची भूमिका महत्वाची असून खालीलप्रमाणे जबाबदाऱ्या निश्चित करण्यात येत आहेत.

- शिक्षण संचालक, उ.शि. व संचालक तंत्रशिक्षण हे या अभियानासाठचे प्रशासकीय, शैक्षणिक व उपक्रम नियंत्रण अधिकारी म्हणून कामकाज करतील.
- सर्व विभागीय सहसंचालक उ.शि./तं.शि. हे संचालक यांचे निर्देशानुसार आवश्यकतेनुसार सदर अभियानास विभाग स्तरावरील अंमलबजावणी साठीचे कामकाजात मदत करतील.

क. संबंधित सर्व विद्यापीठे आणि महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ (MSBTE) यांस अभियान आणि अभियानातील उपक्रम अंमलबजावणी बाबत मार्गदर्शन करणे.

ख. अभियान राबविण्यासाठी महाविद्यालय / शैक्षणिक संस्था (institutions), विद्यार्थी, प्रविण्यप्राप्त प्रशिक्षक (मास्टर ट्रेनर), महाविद्यालयीन नोडल अधिकारी/प्राध्यापक आणि अनुषंगिक बाबींच्या याद्या तयार करणे.

ग. अभियानासाठी आवश्यक त्या निर्देशासह राज्य स्तर आणि विद्यापीठ स्तरीय नोडल अधिकारी नियुक्त करणे.

घ. आपल्या विभागाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या नोडल अधिकाऱ्यांच्या मार्फत राज्य कार्यक्रम सचिवालयास (प्रोग्राम सेक्रेटरीएट) सहकार्य करणे.

ङ. आपल्या अधिनस्त महाविद्यालयांत अभियानातील उपक्रमांची अंमलबजावणी करणे विशेषतः ग्रीन क्लब ची स्थापना आणि ग्रीन क्लब च्या माध्यमातून पाणी बचतीच्या ०७ सोप्या (low-touch) उपाययोजना आणि पाणी व उर्जा वापराचा ताळेबंद (ऑडीट) करणे.

[उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाने सर्व महाविद्यालये आणि विद्यापीठांना ग्रीन क्लब तयार करण्याचे निर्देश द्यावेत ज्यामुळे विद्यार्थी संस्थात्मक रचनेच्या माध्यमातून उपक्रम राबविण्यास प्रतिबद्ध होतील. प्रत्येक क्लबमध्ये किमान १०० विद्यार्थी सदस्य आणि महाविद्यालयीन नोडल अधिकारी/प्राध्यापक असणे आवश्यक आहे. ग्रीन क्लब बद्दल विस्तृत टीपण आ.अभियान व्यवस्था/यंत्रणा व नोडल अधिकारी यांची नियुक्ती मधील मुद्दा क्रमांक ०७ मध्ये दिले आहे]

च. या अभियानातील प्रशिक्षण आणि अनुषंगिक उपक्रमांसाठी महाविद्यालय स्तरावर जागा उपलब्ध करवून देण्यासाठी आवश्यक त्या सूचना व मार्गदर्शन करणे

छ. या अभियानांतर्गत तयार करण्यात आलेल्या अल्प मुदतीचे अभ्यासक्रम [-सेल्फ-पेस्ड कोर्स (Self-Paced Course)] बाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे

ज. सदर अभियानाच्या प्रचार प्रसारासह विशेष कार्य करणाऱ्या प्राध्यापक, विद्यार्थी आणि नोडल अधिकारी यांनी राबविलेल्या उपक्रमांचा प्रसार करणे व संबंधितांना प्रोत्साहन देणे

**३. राष्ट्रीय सेवा योजना**

क. राष्ट्रीय सेवा योजनेच्या अधिनस्त असलेल्या अधिकाऱ्यांची विद्यापीठ आणि जिल्हा पातळीवर नोडल अधिकारी नियुक्त करणे.

ख. राज्य कार्यक्रम सचिवालयास प्रतिनिधित्व करण्यासाठी नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करणे व सचिवालयास सहकार्य करणे.

ग. राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत राज्य, विद्यापीठ आणि जिल्हास्तरावर नेमलेल्या नोडल अधिकाऱ्यांस वेळोवेळी मार्गदर्शन करणे.

घ. महाविद्यालय स्तरावर स्थापना करण्यात आलेल्या ग्रीन क्लब मध्ये राष्ट्रीय सेवा योजनेत सहभागी असलेल्या युवकांना सक्रीय सहभाग घेण्यास प्रोत्साहित करणे.

ङ. या अभियानातील विविध उपक्रम राष्ट्रीय सेवा योजनांच्या शिबिरांच्या माध्यमातून गावोगावी राबविणे.

च. तसेच संबंधित उच्चशिक्षण आणि तंत्रशिक्षण महाविद्यालय/institution मध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या धरतीवर उपक्रम अंमलबजावणी साठी सहकार्य आणि मार्गदर्शन करणे.

## प्रपत्र २: अभियान व्यवस्था/यंत्रणा व नोडल अधिकारी यांची नियुक्ती करणेबाबत

या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी खालील प्रमाणे व्यवस्था/यंत्रणा स्थापित व नोडल अधिकारी नियुक्त करण्यात येत आहेत. तत्संबंधी आपले स्तरावरून खालील प्रमाणे स्थापित करण्यात आलेल्या व्यवस्था आणि मनुष्यबळ यांस सुचना निर्गमित कराव्या आणि कार्यपूर्ती साठी प्रयत्न करावे.

### एकूण कार्यक्रम यंत्रणा/व्यवस्था

| अनु. | यंत्रणा/व्यवस्था | एकूण संख्या | अंमलबजावणी स्तर |
|---|---|---|---|
| १ | राज्य कार्यक्रम सचिवालय | ०१ | राज्यस्तर |
| २ | राज्यस्तरीय उच्च शिक्षण, तंत्र शिक्षण आणि राष्ट्रीय सेवा योजना नोडल अधिकारी (प्रत्येकी एक) | ०३ | राज्यस्तर |
| ३ | विद्यापीठ स्तरीय नोडल अधिकारी- उच्च शिक्षण (०६) आणि राष्ट्रीय सेवा योजना (०६) प्रती विद्यापीठ एक या प्रमाणे | १२ | विद्यापीठ स्तर |
| ४ | जिल्हास्तरीय नोडल अधिकारी (प्रत्येकी १३ याप्रमाणे-उच्च शिक्षण, तंत्र शिक्षण आणि राष्ट्रीय सेवा योजना) | ३९ | जिल्हास्तर |
| ५ | प्रवीण प्रशिक्षण (मास्टर ट्रेनर) | आवश्यकते प्रमाणे | महाविद्यालय स्तर |
| ६ | ग्रीन क्लब (प्रत्येक महाविद्यालय / शैक्षणिक संस्था (educational institution) स्तरावर स्थापन करणे) | प्रती एक याप्रमाणे १३ जिल्ह्यात एकूण ३०५८ | महाविद्यालय / शैक्षणिक संस्था (educational institution) |
| ७ | अभियान सहयोगी संस्था (ॲक्वाडॅम) द्वारे नियुक्त क्षेत्रीय अधिकारी (संशोधक/समन्वयक, कार्यक्रम अधिकारी, इंटर्न) | किमान १० | राज्य व जिल्हा स्तर |

कार्यक्रम व्यवस्था/यंत्रणा निहाय रचना, भूमिका व जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे आहेत.

**१. राज्य कार्यक्रम सचिवालय (प्रोग्राम सेक्रेटरीएट)**

| अनु. | पदनाम | सचिवालयातील पद |
|---|---|---|
| १ | संचालक, उच्च शिक्षण | अध्यक्ष |
| २ | नोडल अधिकारी, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई | सदस्य |
| ३ | नोडल अधिकारी, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे | सदस्य |
| ४ | नोडल अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.) | सदस्य सचिव |
| ५ | प्रतिनिधी १, युनिसेफ, मुंबई | सदस्य |
| ६ | प्रतिनिधी २, युनिसेफ, मुंबई | सदस्य |
| ७ | प्रतिनिधी १, अॅक्वाडॅम | सदस्य तथा समन्वयक |

राज्य कार्यक्रम सचिवालयाच्या जबाबदाऱ्या व कर्तव्य खालील प्रमाणे असतील,

१. या अभियानांतर्गत नियोजित उपक्रमांच्या अंमलबजावणीच्या योजना तयार करणे
२. विद्यापीठ आणि जिल्ह्यांमध्ये नियुक्त केलेल्या नोडल अधिका-यांच्या समन्वयातून अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करणे
३. राज्य, विद्यापीठ आणि जिल्हास्तरीय नोडल व्यक्ती/अधिकारी, व्यक्ती/ प्रवीण प्रशिक्षण (मास्टर ट्रेनर), शैक्षणिक संस्था, आणि महाविद्यालयीन तरुणांची यादी एकत्रित करणे
४. जिल्हा आणि विद्यापीठ नोडल अधिकाऱ्यांच्या मदतीने प्रवीण प्रशिक्षकांसाठी (मास्टर ट्रेनर्स) प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करणे
५. अभियान अंमलबजावणी साठी निवडलेल्या १३ जिल्ह्यांमधील शैक्षणिक संस्थांना आवश्यक मार्गदर्शन करणे
६. अभियानातील विविध उपक्रम समुदाय आणि विविध स्तरावर राबविण्यासाठी प्रवीण प्रशिक्षक (मास्टर ट्रेनर्स) आणि युवकांना मार्गदर्शन करणे व चालना देणे
७. जिल्हानिहाय कार्यक्रम अंमलबजावणी प्रगतीचे दस्तऐवजीकरण करून अहवाल सादर करणे
८. सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे नोडल अधिकारी, युवक आणि शैक्षणिक संस्थाच्या नोंदी घेणे, त्यांना प्रोत्साहनपर पुरस्कार देणे, उत्कृष्ट उपक्रमांचा विविध माध्यमांच्या मार्फत प्रचार-प्रसार करणे, इत्यादी.
९. अभियानातील विविध उपक्रमांचे नियोजन करण्यासाठी ठराविक कालावधीमध्ये (किमान चार महिन्यातून एक वेळेस) भेटणे

## २. राज्यस्तरीय उच्च शिक्षण, तंत्र शिक्षण आणि राष्ट्रीय सेवा योजना नोडल अधिकारी

अभियान अंमलबजावणीसाठी उच्चशिक्षण, तंत्र शिक्षण संचालानालय व राष्ट्रीय सेवा योजना यांची महत्वपूर्ण भूमिका आहे. यासाठी संबंधित विभागाच्या (उच्च, तंत्र शिक्षण आणि राष्ट्रीय सेवा योजना) भूमिका व जबाबदाऱ्या परिच्छेद *-अ.२०* प्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या आहेत. अभियानाच्या प्रभावी व सतत अंमलबजावणी साठी विभागनिहाय प्रत्येकी एक याप्रमाणे राज्यस्तरीय नोडल अधिकारी नेमले जातील आणि त्यांच्या जबाबदाऱ्या खालील प्रमाणे असतील

१. अभियान कालावधीत उपक्रम नियोजन, अंमलबजावणी आणि सनियंत्रण यासाठी सचिवालयास सहकार्य करणे
२. विद्यापीठांमार्फत शैक्षणिक संस्थांना आवश्यक मार्गदर्शन आणि सूचना करणे
३. विद्यापीठ आणि जिल्हास्तर येथे संबंधित विभागातील नोडल अधिकारी नियुक्त करणे आणि मार्गदर्शन करणे
४. नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांमार्फत कार्यक्रमाच्या आवश्यकतेनुसार संबंधित विद्यापीठ आणि महाविद्यालयांच्या सहकार्याने अभियान संबंधित प्रगतीचे आणि अनुषंगिक माहितीचे एकत्रीकरण करणे
५. प्रधान सचिव, उच्च आणि तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम अंमलबजावणी व प्रगतीचे सनियंत्रण करणे
६. उच्च व तंत्र शिक्षण विभाग व राष्ट्रीय सेवा योजनेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांस अभियानाचे अंमलबजावणी व प्रगती बाबत अवगत करणे व त्यांचे सूचनेनुसार कार्यवाही करणे

## ३. विद्यापीठ स्तरीय नोडल अधिकारी

सदरील अभियान राज्यातील निवडक विद्यापीठ आणि त्यांतर्गत असलेल्या महाविद्यालयांत राबविले जात असून, प्रत्येक विद्यापीठ कार्यपद्धती वेगवेगळी असल्याने विद्यापीठ स्तरीय [प्रती विद्यापीठ एक या प्रमाणे उच्च शिक्षण (एकूण ०६) आणि राष्ट्रीय सेवा योजना (एकूण ०६) ] एकूण १२ नोडल अधिकारी या अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणी साठी नियुक्त करण्यात येत आहेत. या नोडल अधिकाऱ्यांच्या भूमिका व जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे असतील

१. उच्च शिक्षण आणि राष्ट्रीय सेवा योनाजेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी व नोडल अधिकाऱ्यांनी दिलेल्या मार्गदर्शनाच्या आधारे महाविद्यालयांना सूचना/मार्गदर्शक तत्व निर्गमित करणे
२. कार्यक्रम सचिवालय आणि जिल्हा नोडल अधिकारी आणि शैक्षणिक संस्था यांच्यातील समन्वयक म्हणून काम पाहणे
३. विद्यापीठ अंतर्गत असलेल्या सर्व महाविद्यालय आणि शैक्षणिक संस्था (educational institution) यांना अभियानामध्ये सक्रीय सहभाग घेण्यासाठी प्रवृत्त करणे

४. सेल्फ-पेस्ड कोर्स साठी विद्यार्थी आणि महाविद्यालयांना मार्गदर्शन करणे
५. विद्यापीठ स्तरावर अभियान संबंधी समन्वय, अभियान अंमलबजावणी प्रगतीचा आढावा घेणे, सनियंत्रण आणि विद्यापीठाच्या नियमित/विविध उपक्रमांत अभियान उपक्रमांचा (activities) समावेश करणे

## ४. जिल्हास्तरीय नोडल अधिकारी

सदरील अभियान राज्यातील निवडक १३ जिल्ह्यात राबविले जात असून यामध्ये जिल्ह्यातील सर्व महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्था जसे पॉलिटेक्निक, फार्मसी, अभियंता, इत्यादी मध्ये राबविण्याचे ठरविले आहे. यासाठी जिल्ह्यातील संबंधित उच्च आणि तंत्र शिक्षण विभागांतर्गत असलेल्या महाविद्यालयांचे/शिक्षणिक संस्थांच्या सोबत समन्वय साधून अभियानातील उपक्रम राबविण्यासाठी उच्च शिक्षण, तंत्र शैक्षणिक आणि राष्ट्रीय सेवा योजना यांचे जिल्हास्तरावर प्रत्येकी एक प्रमाणे प्रती जिल्हा ३ नोडल अधिकारी आणि १३ जिल्ह्यांमध्ये एकूण ३९ जिल्हास्तरीय नोडल अधिकारी नियुक्त करण्यात येत आहे.

या नोडल अधिकाऱ्यांच्या जबाबदाऱ्या खालील प्रमाणे असतील
राज्य कार्यक्रम सचिवालय (प्रोग्राम सेक्रेटरीएट) नियुक्त जिल्हास्तरीय संशोधक/समन्वयक आणि विद्यापीठ व जिल्हास्तरीय नोडल अधिकाऱ्यांचे सहकार्य असेल.

१. जिल्ह्यातील संस्थांना उपक्रमाबाबतचे मार्गदर्शन करणे
२. जिल्हानिहाय प्रवीण प्रशिक्षण (प्रवीण प्रशिक्षकांची निवड आणि त्यांच्या जबादारी बाबत टीपण पुढे दिलेले आहे), शैक्षणिक संस्थांमधील नोडल व्यक्ती/प्राध्यापकांची आणि युवकांची यादी तयार करणे आणि ॲप/प्रोग्राममध्ये त्यांची नोंद करणे
३. संबंधित जिल्ह्यांमध्ये मास्टर ट्रेनर्सच्या, नोडल व्यक्ती/प्राध्यापकांच्या आणि युवकांच्या प्रशिक्षणाचे नियोजन, अंमलबजावणी आणि सनियंत्रण करणे
४. प्रत्येक महाविद्यालयात नोडल अधिकारी/प्राध्यापकांच्या माध्यमातून ग्रीन क्लबची स्थापना करण्यासाठी मार्गदर्शन आणि सहकार्य करणे
५. जिल्ह्यातील उपक्रमांचे समन्वयन करणे व गुणवत्ता पूर्ण अंमलबजावणी साठी प्रयत्न करणे
६. संबंधित राज्य नोडल व्यक्तींना जिल्हानिहाय प्रगती बाबत माहिती देणे/अहवाल देणे
७. राज्य कार्यक्रम सचिवालयामार्फत आयोजित विविध कार्यशाळा, क्षमता बांधणी प्रशिक्षण, आणि बैठकात सक्रीय सहभाग घेणे.

## ५. महाविद्यालय/शैक्षणिक संस्था (educational institution) स्तरीय नोडल अधिकारी/प्राध्यापक

१. या अभियानासाठी नियुक्त महाविद्यालय स्तरीय नोडल प्राध्यापक हे ग्रीन क्लब चे संयोजक (convener) असतील

२. महाविद्यालय स्तरावर युवकांचा (youths) ग्रीन क्लब स्थापन करणे. यामध्ये अधिकाधिक युवक/युवतींनी सहभाग घेण्यासाठी प्रेरित करणे.
३. युवकांच्या सहभागाने नैसर्गिक संसाधनांचे सरंक्षण व पाण्याची बचत॰ अभियानाअंतर्गत युवकांना हवामान व वातावरणीय बदल, नैसर्गिक संसाधनांचे जतन व संरक्षण, पाणी बचतीच्या उपाययोजना आणि अनुषंगिक कौशल्य अवगत करण्यासाठी महाविद्यालय स्तरावर विविध उपक्रमांचे आयोजन करणे.
४. ग्रीन क्लबच्या रचनेनुसार ग्रीन क्लब करिता अध्यक्ष, उपाध्यक्ष व दोन समन्वयक यांची नियुक्ती करणे.
५. अभियानाअंतर्गत राबविलेल्या उपक्रमांची माहिती जिल्हा समन्वयकांच्या माध्यमातून विद्यापीठ स्तरावारती कळविणे.
६. महाविद्यालय स्तरावर या विषयातील तज्ञ व्यक्तींना बोलावून विषयाबाबतचे ज्ञान/कौशल्य युवकांमध्ये (youths) रुजविण्यासाठी प्रयत्न करणे.
७. महाविद्यालय स्तरावर युवकांच्या (youths) माध्यमातून प्रभावी प्रकल्प राबविणे.
८. महाविद्यालय स्तरावर आयोजित करण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रम जसे स्नेहसंमेलन, क्रीडा महोत्सव, ई. मध्ये -युवकांच्या सहभागाने नैसर्गिक संसाधनांचे सरंक्षण व पाण्याची बचत॰ या अभियानाबाबत चे संदेश देणे.
९. अभियानांतर्गत आयोजित प्रशिक्षण, बैठक, चर्चासत्र, ई मध्ये सहभागी होणे.
१०. ग्रीन क्लब आणि युवकांनी राबविलेल्या उपक्रमांचे दस्तऐवजीकरण आणि प्रसार यासाठी प्रयत्न करणे.

## ६. प्रवीण प्रशिक्षक (मास्टर ट्रेनर)

अभियानाअंतर्गत युवकांना हवामान व वातावरणीय बदल, नैसर्गिक संसाधनांचे जतन व संरक्षण, पाणी बचतीच्या उपाययोजना आणि अनुषंगिक कौशल्य अवगत करवून त्यांची क्षमता बांधणी करण्यासाठी जिल्हानिहाय प्रवीण प्रशिक्षक (मास्टर ट्रेनर) नियुक्त करणे अपेक्षित आहे. एकंदर प्रवीण प्रशिक्षक क्षेत्रीय स्तरावर कार्यक्रमातील प्रशिक्षण अंमलबजावणीची महत्वपूर्ण जबाबदारी पार पडतील. त्यांच्या निवडीचे निकष आणि जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे आहेत.

### ६.१. प्रवीण प्रशिक्षक (मास्टर ट्रेनर) निवडीचे निकष

१. उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना (NSS) मधील विद्यमान मास्टर ट्रेनर्सना प्राधान्य असेल.
२. विद्यार्थी विकासाचे उपक्रम आणि नाविन्यपूर्ण कार्यक्रमांमध्ये सक्रिय असणारे प्राध्यापक/संसाधन व्यक्ती .
३. पर्यावरण विज्ञान, शास्वतता, पाण्याशी संबंधित विषयांमध्ये आवड असणारे प्राध्यापक/संसाधन व्यक्ती.

४. तसेच स्थानिक/महाविद्यालय स्तरावर सक्रीय असणारे विद्यार्थी सुद्धा प्रवीण प्रशिक्षक म्हणून काम करू शकतील.
५. स्थानिक/विद्यापीठ निहाय प्रशासकीय निवडीच्या निकषांना अनुसरून निवड केली जाऊ शकते .
६. प्रभावी संवाद कौशल्य असणाऱ्या प्राध्यापकांना प्राधान्य देण्यात यावे.
७. महिला व पुरुष प्रवीण प्रशिक्षकांच्या संतुलनास प्राधान्य देण्यात यावे.

वरील निकष हे सूचक (indicative) असून स्थानिक पातळीवर प्रभावी व योग्य असणारे निकष विचारात घेण्यास हरकत नाही.

**६.२. प्रवीण प्रशिक्षकांच्या (मास्टर ट्रेनर) मुख्य जबाबदाऱ्या**

विद्यापीठ व जिल्हास्तरीय नोडल अधिकाऱ्यांच्या आणि अभियान सहयोगी संस्था ॲक्वाडॅमद्वारे नियुक्त क्षेत्रीय अधिकारी (संशोधक/समन्वयक, कार्यक्रम अधिकारी, इंटर्न) सहकार्याने प्रवीण प्रशिक्षकांच्या (मास्टर ट्रेनर) जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे असतील

१. अभियान आणि अभियानातील उपक्रम समजून घेण्यासाठी प्रशिक्षकांच्या प्रशिक्षणात सहभागी होणे.
२. महाविद्यालयीन युवकांसाठी हवामान बदल आणि पाणी बचतीच्या उपाययोजना विषयावर स्थानिक महाविद्यालये/शैक्षणिक संस्था येथे प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करणे
३. संबंधित शैक्षणिक संस्थांमध्ये ग्रीन क्लब स्थापन करणे, त्यांचे सनियंत्रण आणि निरीक्षण करणे, आणि अहवाल देणे.
४. महाविद्यालयीन नोडल व्यक्ती/प्राध्यापक यांना युवकांची (youths) यादी तयार करण्यासाठी आणि युवकांना ॲपवर नावनोंदणी करण्यासाठी मदत करणे.
५. पाणी बचतीच्या उपाययोजना राबविण्यासाठी विद्यार्थी आणि महाविद्यालयीन नोडल व्यक्ती/ अधिकारी यांना मार्गदर्शन व सहकार्य करणे.
६. ग्रीन क्लब आणि युवकांनी (youths) राबविलेल्या उपक्रमांचे दस्तऐवजीकरण आणि प्रसार यासाठी प्रयत्न करणे.

**७. ग्रीन क्लब**

सदरील अभियानामध्ये लक्षित आणि निरंतर उपक्रम राबविण्यासाठी महाविद्यालय/शैक्षणिक संस्थांमध्ये ग्रीन क्लब स्थापित करावयाचे आहेत. हे ग्रीन क्लब्स सदरील अभियान आणि अभियान पश्चात पर्यावरण/निसर्ग, वातावरण, हवामान, पाणी बचतीच्या उपाययोजना राबवीत रहातील या उद्देशाने स्थापित करण्याचे अधोरीखीत करण्यात येत आहे. ग्रीन क्लब बद्दल विस्तृत टीपण खालील प्रमाणे आहे

**ग्रीन क्लब-उद्देश**

या अभियानांतर्गत युवकांना (youths) पर्यावरण विषयक उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी आणि पर्यावरण पूरक प्रकल्प हाती घेण्यास सक्षम करण्याचा उद्देश आहे. ग्रीन क्लबच्या माध्यमातून युवकांमध्ये (youths) हवामानविषयक कृतीबद्दल जागरूकता वाढवण्यासाठी विद्यार्थी एकत्र येऊ शकतात. त्याचबरोबर ग्रीन क्लब च्या माध्यमातून खालील उद्देश साध्य करण्यावर अभियानाचा भर असेल

- युवकांच्या (youths) नेतृत्वाखालील ग्रीन क्लब कौशल्ये आणि क्षमता विकसित करण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावतील.
- महाविद्यालयीन युवक (youths) पर्यावरण आणि हवामान बदलाच्या समस्या हाताळताना नवीन कौशल्ये शिकून त्यांच्या व्यावसायिक क्षमतांमध्ये विविधता आणतील.
- ग्रीन क्लबची निर्मिती प्रामुख्याने विद्यापीठे आणि महाविद्यालयांमधील युवकांसोबत (youths) पर्यावरणविषयक उपक्रम आणि प्रकल्पांना चालना देण्यासाठी समन्वय करतील
- हे क्लब युवकांसाठी (youths) शाश्वत जीवनशैली, ज्ञान आणि नेतृत्व कौशल्ये विकसित करण्यासाठीचे व्यासपीठ म्हणून काम करतील.
- या अभियानातील उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी महाविद्यालयीन स्तरावरील अभ्यासक्रमात ग्रीन क्लब्सचा समावेश केला जाऊ शकतो.

**ग्रीन क्लब-रचना**

- या अभियानासाठी नियुक्त महाविद्यालय स्तरीय नोडल प्राध्यापक हे ग्रीन क्लब चे संयोजक (convener) असतील
- ग्रीन क्लब मार्फत पर्यावरण पूरक उपक्रमाबद्दल आवड आहेत असे युवक (youths) स्वयंसेवक/विद्यार्थी या उपक्रमांमध्ये स्वतःची नोंदणी करू शकतात.
- महाविद्यालयात प्रथम व द्वितीय वर्षात शिकत असलेल्या विविध अभ्यासक्रमांच्या युवकांना या मध्ये सदस्य म्हणून सहभाग घेता येईल
- ग्रीन क्लब मध्ये किमान १०० स्वयंसेवक विद्यार्थी नोंदणीकृत असावेत
- ग्रीन क्लबसाठी विद्यार्थ्यांमधून एक अध्यक्ष, एक उपाध्यक्ष, आणि दोन समन्वयक यांची नियुक्ती केली जाईल. हे चार प्रमुख सदस्य विविध उपक्रमांचे समन्वय साधण्यासाठी आणि महाविद्यालय स्तरावर त्यांची अंमलबजावणी, देखरेख, आणि अहवाल सादर करण्यात महत्वाची भूमिका व जबाबदारी पार पाडतील.
- ग्रीन क्लब च्या कामात समन्वयकाला मदत करण्यासाठी विद्यार्थी गट देखील असेल. हा गट महाविद्यालातील एकूण सर्व विद्यार्थ्यांचासुद्धा असू शकतो

- क्लब सदस्यत्व किमान २ वर्षांसाठी असेल, २ वर्षांच्या प्रतिबद्ध कालावधीपश्चात युवक स्वयंसेवकांना प्रमाणपत्र मिळेल
- महाविद्यालयाने ग्रीन क्लबला पर्यावरणपूरक उपक्रमांसाठी आवश्यक असलेले सर्व सहकार्य देणे आणि त्यासाठी आर्थिक तरतूद करणे अपेक्षित आहे
- क्लबकडे वार्षिक कृती उपक्रम कॅलेंडर असणे अपेक्षित आहे आणि या उपक्रमांचे छोटे-मोठे परिणाम मोजले जातील.

**ग्रीन क्लब-कार्ये**

१. महाविद्यालयाच्या पाणी वापराचा ताळेबंद (ऑडिट) करणे
२. महाविद्यालयाचे ऊर्जा वापराचे ग्रीन ताळेबंद (ऑडिट) करणे
३. महाविद्यालयातील कचराचे व्यवस्थापन करून झीरो वेस्ट उपक्रम राबविणे
४. स्थानिक परिस्थितीनुसार पर्यावरण, हवामान व वातावरण बदल विविध उपक्रम राबविणे
५. पाणी बचतीचे उपक्रम (अनिवार्य):

युवकांच्या (youths) सहकार्याने पाण्याचा अपव्यय कमी करण्यावर भर देणाऱ्यापाणी बचतीच्या ०७ सोप्या (low-touch) <u>अनिवार्य उपाययोजना</u>

१. दात घासताना नळ बंद ठेवणे व तसे करण्यास इतरांस प्रवृत्त करणे
२. शेविंग (दाढी) करते वेळी नळ बंद ठेवणे व तसे करण्यास इतरांस प्रवृत्त करणे
३. शॉवरने अंघोळ करत असल्यास कमी वेळेत अंघोळ आटोपणे किंवा बकेटच्या सहाय्याने अंघोळ करणे
४. पाणी अपव्यय टाळण्यासाठी नळ गळती दुरुस्त करणे व तसे करण्यास इतरांस प्रवृत्त करणे
५. वॉशिंग मशीन पूर्ण क्षमतेने चालविणे आणि तसे करण्यास इतरांस प्रवृत्त करणे
६. वैयक्तिक घरगुती स्तरावर शोष खड्डे तयार करण्यास प्रवृत्त करणे
७. समुदाय स्तरावर शोष खड्डे तयार करण्यास प्रवृत्त करणे.

## ८. अभियान सहयोगी संस्था (ॲक्वाडॅम) द्वारे नियुक्त क्षेत्रीय अधिकारी (संशोधक/समन्वयक, कार्यक्रम अधिकारी, इंटर्न) यांच्या जबाबदाऱ्या

या अभियानांतर्गत कार्यक्रम सचिवालयामार्फत जिल्हा व राज्यस्तरावर नोडल अधिकाऱ्यांचा सहकार्याने उपक्रम राबविण्यासाठी एकूण १० प्रतिनिधी नेमण्यात आले आहेत. ते कार्यक्रमाच्या विविध टप्प्यांवर खालीलप्रमाणे विद्यापीठ, जिल्हा, व आवश्यकता असल्यास महाविद्यालय स्तरावर अभियानातील उपक्रमांची अंमलबजावणी करतील

१. राज्य कार्यक्रम सचिवालयाच्या देखरेखीखाली विद्यापीठ, जिल्हा आणि महाविद्यालय स्तरावर नियुक्त नोडल अधिकारी/प्राध्यापक आणि संसाधन व्यक्तींच्या सहकार्याने कार्यक्रम उपक्रम राबविणे.

२. नोडल अधिकारी/प्राध्यापक, प्रवीण प्रशिक्षक (मास्टर ट्रेनर), शैक्षणिक संस्था, महाविद्यालयीन युवकांची (youths) संख्या, इत्यादींची यादी एकत्रित करणे.
३. जिल्हा आणि विद्यापीठ नोडल व्यक्तींच्या मदतीने मास्टर ट्रेनर्ससाठी प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करणे.
४. जिल्ह्यांमधील शैक्षणिक संस्थांना आवश्यक सल्ला आणि सूचना जारी करण्यासाठी जिल्हा आणि विद्यापीठाच्या नोडल अधिकाऱ्यांना मदत करणे.
५. अभियानातील उपक्रम राबविण्यासाठी आणि त्यातील सातत्य राखण्यासाठी प्रवीण प्रशिक्षक (मास्टर ट्रेनर्स) आणि महाविद्यालय नोडल अधिकारी यांना सहकार्य करणे.
६. युवकांच्या (youths) च्या माध्यमातून इतर लोकांपर्यंत (उदा. परिवार, समुदाय, गाव, वार्ड, ई.) पोहोचण्यासाठी प्रवीण प्रशिक्षक (मास्टर ट्रेनर्स) आणि युवकांना (youths) सहकार्य करणे.
७. जिल्हानिहाय कार्यक्रम अंमलबजावणी स्थितीचे दस्तऐवजीकरण आणि अहवाल देणे
८. सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे नोडल अधिकारी, युवक (youths) आणि शैक्षणिक संस्थाची यादी करणे, त्यांनी केलेल्या उपक्रमांची विविध माध्यमांच्या मार्फत प्रसिद्धी करणे, आणि त्यांना प्रोत्साहन देणाऱ्या उपक्रमांचे आयोजन करणे.
९. राज्य कार्यक्रम सचिवालयास वेळोवेळी अंमलबजावणी प्रगती बाबत अवगत करणे, वेळोवेळी नियोजित बैठक आणि कार्यशाळा यामध्ये सहभागी होणे.
१०.अभियान अनुषंगिक उपक्रम आणि कृती कार्यक्रम राबविणे.